आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)

बुधवार, दिनांक : ९ ऑक्टोबर, २०२४

ठळक बातम्या

1. नागपूर विमानतळाच्या अद्ययावतीकरण प्रकल्पासह राज्यातल्या ७ हजार ६०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि नवीन दहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन.

2. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील ४६ हजार विद्यार्थ्यांना विद्यावेतनाच्या पहिल्या हप्त्यासाठी राज्य सरकारकडून ४२ कोटी डी बी टी द्वारे जमा करण्यात येणार.

3. पुढील २५ वर्षे शेतकऱ्यांना मोफत वीज पुरवठा करण्यात येणार असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन.

4. अशक्तपणा आणि कुपोषणाचं व्यवस्थापन आयुर्वेदाद्वारे करण्यासाठी आयुष मंत्रालयातर्फे ‘मिशन उत्कर्ष प्रकल्प’ आणि ‘प्रोजेक्ट (**EMRS**) ईएमआरएस’ ची सुरुवात.

5. ६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन वर्धापन दिन कार्यक्रमाला उद्यापासून सुरुवात; १२ ऑक्टोबरला सायंकाळी होणार मुख्य कार्यक्रम.

---

विकास प्रकल्प/ शासकीय महाविद्यालय लोकार्पण

महाराष्ट्रात दहा वैद्यकीय महाविद्यालयं स्थापन होणं, हा लाखो लोकांचं भलं करण्यासाठीचा महायज्ञ आहे, यामुळे राज्यातल्या युवकांसाठी नव्या संधीची दारं उघडतील, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज राज्यातल्या सात हजार ६०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची दूरदृश्य प्रणालीद्वारे पायाभरणी केली. तसंच राज्यातल्या नवीन दहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचं उद्घाटन केलं, त्यावेळी ते बोलत होते.

*(पीएम नरेंद्र मोदी :- आज महाराष्ट्र को 10 मेडिकल कॉलेज की सौगात मिल गई है नागपुर एयरपोर्ट के आधुनिकीकरण और विस्तार का काम शिरडी एयरपोर्ट*

*के लिए एक टर्मिनल बिल्डिंग का निर्माण आज इंफ्रास्ट्रक्चर से जुड़े इन दो अहम प्रोजेक्ट का शिलान्यास भी हुआ है महाराष्ट्र के इतिहास में इतनी तेज गति*
*से इतने बड़े स्केल पर अलग-अलग क्षेत्र में कभी भी विकास नहीं हुआ मैं सभी विकास कार्यों के लिए महाराष्ट्र के लोगों को बहुत-बहुत बधाई देता हूं ! )*

हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपाला मिळालेल्या यशाबद्दल पंतप्रधान मोदी यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी त्यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. आगामी विधानसभा निवडणुकीत एकजूट होऊन भाजप आणि महायुतीला मतदान करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

विदर्भातील बुलढाणा, वाशिम, अमरावती, भंडारा, गडचिरोली या जिल्ह्यांसह राज्यातील अंबरनाथ, जालना ,हिंगोली मुंबई आणि नाशिक, याठिकाणच्या दहा वैद्यकीय महाविद्यालयाचे उद्घाटन, तसंच नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अद्ययावतीकरण प्रकल्पाची आणि शिर्डी विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीची पायाभरणी आज पंतप्रधानांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे केली. नागपूरमध्ये आयोजित या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबोधित केलं. नागपूर विमानतळाच्या अद्ययावतीकरण प्रकल्पामुळे ९ लाख टन कार्गोची आयात निर्यात करता येईल, असं गडकरी म्हणाले. तर या प्रकल्पामुळे महाराष्ट्रासह मध्य भारतातील अनेक राज्यांना त्याचा फायदा होईल, असं फडणवीस म्हणाले.

*(देवेंद्र फडणवीस :- नागपुर जो भारत का मध्य बिंदु है झिरो माइल है और यहां पर इस एयरपोर्ट के आने से ऐसा मानता हूं पूरे मध्य भारत में रोजगार के अवसर तैयार होंगे पूरे मध्य भारत में बड़े पैमाने पर इन्वेस्टमेंट आएगी और विशेष रूप से नागपुर के कार्गो को एक बहुत बड़ी इसके कारण चालना मिलेगी ।*

कॅबिनेट निर्णय

अशक्तपणा आणि सूक्ष्म पोषक तत्वांची कमतरता कमी करण्यासाठी सरकारने आज फोर्टिफाइड अर्थात पोषक तांदळाच्या पुरवठ्याला मान्यता दिली आहे. आज नवी दिल्लीत मंत्रिमंडळाच्या निर्णयांबाबत पत्रकार परिषदेला संबोधित करताना माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली. पोषण सुरक्षा आणि सर्वसमावेशक विकासाच्या दिशेने हे महत्वाचे पाऊल असल्याचं ते म्हणाले. या योजनेसाठी एकूण **17** हजार कोटी रुपये खर्च करण्यात येईल.

सरकारने गुजरातमधील लोथल इथं राष्ट्रीय सागरी वारसा संकुलास मान्यता दिली आहे. याशिवाय राजस्थान आणि पंजाबच्या सीमावर्ती भागात दोन हजार **280** किलोमीटर लांबीच्या रस्त्यांच्या बांधकामाला देखील आज केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

---

युवा कार्य प्रशिक्षण

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी नाव नोंदणी केलेल्या आणि सध्या आस्थापनांच्या माध्यमातून इंटर्नशिप करत असलेल्या ४६ हजार विद्यार्थ्यांना विद्यावेतनाचा पहिला हप्ता मिळणार असल्याची माहिती राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. डिबिटी मार्फत विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात विद्यावेतनाची रक्कम जमा करण्यात येणार आहे. यासाठी राज्य सरकारकडून ४२ कोटी रुपये वितरित करण्यात येणार असल्याचंही लोढा यांनी सांगितलं.
युवकांना रोजगारक्षम बनवण्यासाठी तसंच कामाचा प्रत्यक्ष अनुभव नसल्यामुळे रोजगार अथवा स्वयंरोजगार निर्माण करण्यात येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली असून ५ हजार ५०० कोटी रुपयांचा निधीही मंजूर केला. आजघडीला महाराष्ट्रात एकूण ३ लाख ६९ हजार ७९८ प्रशिक्षणार्थीनी नोंदणी केली असून, १ लाख ७९ हजार ३१८ प्रशिक्षणार्थीना नियुक्ती देण्यात आली आहे.

---------------------------------------------------

फडणवीस

शेतकऱ्यांना शेतीसाठी वीज पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र वीज कंपनी तयार करण्यात आली असून त्याअंतर्गत करण्यात आलेल्या नियोजनामुळे पुढील २५ वर्षे शेतकऱ्यांना मोफत वीज पुरवठा करण्यात येणार आहे. सौरऊर्जेच्या वापराचे नियोजन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले असून पंतप्रधानांनी महाराष्ट्राचे धोरण इतर राज्यानी राबवावे अशा सूचना केल्याचे गौरवोद्गार उपमुख्यमंत्री आणि ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

नागपूरच्या वनामती इथं विदर्भ आणि मराठवाड्याचं पायाभूत सुविधा सक्षमीकरण आणि विस्तारीकरणाच्या १ हजार ७३४ कोटी रुपयाच्या कामांची सुरुवात, नागपूर जिल्हयातील ३१३ कोटी रुपयाची विद्युत यंत्रणा बळकटीकरण योजना, पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजने अंतर्गत विदर्भातील लाभार्थी शेतकऱ्यांचा सन्मान तसेच मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजने अंतर्गत शेतकऱ्यांचा सन्मान फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.

---------------------------------------------------

आयुष मंत्रालय **100** दिवस

आयुष मंत्रालयाने 'मिशन उत्कर्ष प्रकल्प' आणि 'प्रोजेक्ट **EMRS**' हे दोन महत्त्वाचे प्रकल्प सुरू केले आहेत. मिशन उत्कर्ष हा प्रकल्प **14** ते **18** वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलींमधील ॲनिमियाची लक्षणे ओळखून त्यांची स्थिती सुधारण्यासाठी महिला आणि बाल विकास मंत्रालय आणि आयुष मंत्रालय यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराच्या चौकटीत सुरू करण्यात आला आहे, अशी माहिती नागपूरच्या प्रादेशिक आयुर्वेदिक संशोधन संस्थेचे सहाय्यक संचालक डॉ. मिलिंद सूर्यवंशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. केंद्रात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं तिसऱ्यांदा सरकार बनल्यानंतर आयुष मंत्रालयाच्या **100** दिवसांच्या कामगिरीची माहिती देण्यासाठी आज नागपुरात पत्रकार परिषद घेण्यात आली.

धुबरी, पश्चिम सिंगभूम, बस्तर, गडचिरोली, धौलपूर या पाच जिल्ह्यांतील अंगणवाडी केंद्रांमध्ये नोंदणीकृत किशोरवयीन मुलींना परिणामकारक आणि सुरक्षित आयुर्वेदिक औषधे प्रदान करणे हे मिशन उत्कर्ष प्रकल्पाचं उद्दिष्ट आहे. या योजनेअंतर्गत, **14** ते **18** वर्षे वयोगटातील सुमारे **25** हजार **600** नोंदणीकृत लाभार्थ्यांना प्रभावी आणि सुरक्षित आयुर्वेदिक औषधांचा लाभ मिळणार आहे. सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन आयुर्वेदिक सायन्सेस, ऑल इंडिया आयुर्वेदिक रिसर्च इन्स्टिट्यूट, नवी दिल्ली, तसंच नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेद, जयपूर आणि **IIPH-DIL** या संस्था या कार्यक्रमाची अंमलबजावणी करत आहेत.

याव्यतिरिक्त, एकलव्य मॉडेल निवासी शाळांच्या विद्यार्थ्यांमधील निवडक रोगांवर विशेष लक्ष केंद्रित करून सामान्य आरोग्य तपासणी आणि अशक्तपणा आणि कुपोषणाचं आयुर्वेदिक व्यवस्थापन यासाठी देखील प्रकल्प सुरू करण्यात आला असल्याचं सूर्यवंशी यांनी सांगितलं.

**-----------------------------------------------**

धम्मचक्र प्रवर्तन

नागपूरच्या दीक्षाभूमी इथं दरवर्षीप्रमाणे यंदाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमीच्या वतीने ६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन वर्धापन दिन कार्यक्रमाचं उद्या गुरुवार दिनांक १० ऑक्टोबर ते शनिवार दि. १२ ऑक्टोबरदरम्यान आयोजन करण्यात आलं आहे. मुख्य सोहळा १२ ऑक्टोबरला सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला मुख्य अतिथी म्हणून उत्तरप्रदेशच्या कुशीनगर इथले भिक्षु संघाचे अध्यक्ष भदंत ए.ए.बी. ज्ञानेश्वर, आणि महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचे प्रणेते आकाश लामा, हे असतील, अशी माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमीचे अध्यक्ष तथा धम्मसेना नायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

धम्मदीक्षेचा कार्यक्रम सलग तीन दिवस असणार आहे. त्यानंतर उपासकांना धम्मदीक्षा प्रमाणपत्र वितरित होईल. शुक्रवार दिनांक ११ ऑक्टोबरला सकाळी ९ वाजता ससाईंच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण होईल. यावेळी समता सैनिक दलातर्फे मानवंदना देण्यात येईल. सायंकाळी ६ वाजता प्रबुद्ध बागडे यांच्या संचाद्वारे बुद्ध आणि भीम गीतांच्या कार्यक्रमासह नृत्य आणि नाटक सादर करण्यात येणार आहे. शनिवार दि. १२ ऑक्टोबरला सकाळी ९ वाजता सामूहिक बुद्ध वंदना होणार असून सायंकाळी ६ वाजता ६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन वर्धापन दिनाचा मुख्य कार्यक्रम भदंत ससाई यांच्या अध्यक्षतेखाली होईल.

---------------------------------------------------

महिला टी २०

महिलांच्या टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना श्रीलंकेच्या संघासोबत सायंकाळी साडे सात वाजता होणार आहे. भारतानं पाकिस्तानविरुद्धचा सामना जिंकून २ गुण मिळवले आहेत, तर श्रीलंका पहिले दोन्ही सामने हरल्यामुळे त्यांचं गुणांचं खातं अजून उघडायचं आहे.

---------------------------------------------------